# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 23.11.2025** **वार- रविवार**

---

**उस-वजनचोरी**

उसाची वजन चोरी आणि साखर उतारा चोरीबाबतच्या तक्रारींची चौकशी केली जाणार आहे. यासाठी भरारी पथकांनी तपासण्या कराव्यात, अश्या सूचना प्रादेशिक साखर सहसंचालकांना दिल्या आहेत, अशी माहिती साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांनी दिली. साखर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली पश्चिम महाराष्ट्रातील विविध शेतकरी संघटनांचे पदाधिकारी, प्रतिनिधींबरोबर ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर बैठक झाली. यामध्ये शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारींनुसार संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी शेतकरी संघटनांनी डॉ. कोलते यांच्याकडे केली.

**मतदारयादी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारूप मतदार याद्यांवरील हरकती सूचना आणि तक्रारी स्वीकारण्याचं काम सुरू असून यासाठी 27 नोव्हेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. दरम्यान, या कामामुळे उद्या होणारी जनसंवाद सभा रद्द करण्यात आली आहे, अशी माहिती आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी दिली आहे.

**नवलेपूल अपघात**

नवले पूल अपघाताच्या पार्श्वभूमीवर पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयानं खेड शिवापूर टोल नाक्याजवळ दोन वायुवेग पथकांची नियुक्ती केली आहे. या पथकाकडून वाहनांवर कारवाई केली जात आहे. तसंच आरटीओ प्रशासन आणि दुधभाते नेत्रालयाच्या वतीने नेत्र तपासणी शिबिर झालं. यावेळी केलेल्या चालकांच्या डोळ्याची तपासणीमध्ये सुमारे 35 टक्के चालकांमध्ये दृष्टिदोष आढळून आला. त्यांना तत्काळ चष्मे आणि अन्य उपायांबाबत माहिती देण्यात आली.

**एसटी-महसूल**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून शालेय सहली, देवदर्शन आणि पर्यटनासाठी समूहाद्वारे बस आरक्षण केल्यास घरापर्यंत सेवा देण्यात येते. पुणे एसटी विभागात ऑक्टोबर महिन्यात शालेय सहली, देवदर्शन तसंच पर्यटनासाठी आरक्षित केलेल्या बस मधून सात हजार जणांनी प्रवास केला असून पुणे एसटी विभागाला यातून 23 लाख रुपयांचा महसूल मिळाला आहे, अशी माहिती पुणे एसटी विभागाचे विभाग नियंत्रक अरुण सिया यांनी सांगितलं.

**ठेकेदार**

पोलिसांच्या सीसीटीव्ही प्रकल्पासाठी पुणे महापालिकेने निश्चित केलेल्या अंतरापेक्षा दररोज अधिक किलोमीटर लांबीची रस्ते खोदाई करणाऱ्या ठेकेदाराला पथ विभागानं नोटीस देत काम थांबविण्याचे आदेश देण्यात आले असल्याची माहिती महापालिकेचे उपायुक्त आणि पथविभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. महापालिकेनं शहरात सहा महिन्यांपूर्वी बांधलेले पदपथ पोलिसांच्या सीसीटीव्ही केबलसाठी पुन्हा उखडले आहेत. तसंच नव्यानं केलेले रस्तेही खोदण्यात आले आहेत.

**व्याखानमाला**

संतश्री ज्ञानेश्वर-तुकाराम स्मृती व्याख्यानमाला एमआयटी विश्वशांती विद्यापीठाच्या कोथरूड इथल्या सभागृहात उद्यापासून सुरू होत असून ती येत्या 30 तारखेपर्यंत सुरू राहणार आहे. एमआयटी विश्वशांती विद्यापीठ, विश्वशांती केंद्र आळंदी आणि संतश्री ज्ञानेश्वर-संतश्री तुकाराम महाराज स्मृती व्याख्यानमाला न्यास यांनी संयुक्तपणे या व्याखानमालेचं आयोजन केलं आहे. ही व्याख्यानमाला सर्वांसाठी खुली असल्याची माहिती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत दिली.

**गायनमैफल**

ज्येष्ठ गायक, गुरू पंडित बबनराव हळदणकर यांच्या स्मरणार्थ शास्त्रीय गायन – वादनाच्या विशेष मैफलीचं आज आयोजन करण्यात आलं होतं. गानवर्धन प्रस्तुत आणि रसरंग गुरुकुलाच्या साह्यानं झालेल्या या मैफलीत रसिकांनी पं. हळदणकर यांचे शिष्य पंडित चंद्रशेखर महाजन यांचं गायन तर आकाशवाणीचे व्हायोलिन वादक पंडित रत्नाकर गोखले यांच्या व्हायोलीन वादनाचा आस्वाद घेतला.

**पाणीपुरवठा**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वतीनं वाकड परिसरातल्या कावेरीनगरमध्ये 25 लाख लिटर क्षमतेची पाण्याची टाकी उभारण्यात आली आहे. या पाण्याच्या टाकीमुळे कस्पटेवस्ती, पिंक सिटी रस्ता परिसर, वेणूनगर, कावेरीनगर, पोलीस कॉलनी, दत्त मंदिर रस्ता आदी परिसरातला पाणीपुरवठा सुरळीत होणार आहे.

**बाजारसमिती**

गुलटेकडी इथल्या पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह कर्नाटक, गुजरात, तामिळनाडू ,उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश या राज्यातून सुमारे नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. मागणी वाढल्यानं भेंडी, वांगी, टोमॅटो, शेवगा, दोडका, कारली, दुधी भोपळा या फळभाज्यांच्या भावात वाढ झाली आहे. बहुतांश पालेभाज्यांची तेजी या आठवड्यातही कायम आहे. फळ बाजारात कलिंगड, खरबूज आणि बोरांच्या भावात वाढ झाली आहे तर अन्य फळांचे भाव स्थिर आहेत. लग्नसराईचा हंगाम सुरू असून फुल बाजारात रेलचेल आहे. शोभिवंत फुलांना मोठी मागणी असून आवक वाढल्यानं दर टिकून आहेत.

**हवामान**

पुण्यात आलेली थंडीची लाट सध्या ओसरली असून तापमानात वाढ झाली आहे. येत्या दोन दिवसात आकाश अंशत: ढगाळ राहील आणि तापमान कमाल 33 अंश आणि किमान 17 अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**